# भारती विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरु तंत्रनिकेतनमधील प्राध्यापकांची स्पृहणीय कामगिरी

कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेमध्ये ऑक्सीजनची जी कमतरता पुणे जिल्ह्यात भासली त्यावर ऑक्सीजनचा प्रभावी वापर करणे गरजेचे असून त्याकरीता हॉस्पिटलमधील स्टाफचे प्रबोधन करणे गरजेचे आहे, हे ओळखून **डीटीई चे संचालक मा. श्री. अभय वाघ व मा. जिल्हाधिकारी, पुणे** यांनी सरकारी महाविद्यालयांबरोबरच खाजगी महाविद्यालयातील यंत्र आणि विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापकांना ऑक्सीजन ऑडिट करण्याच्या कामात सहभागी होण्याचे आवाहन केले होते, त्यास प्रतिसाद देऊन समाजाचे आपण देणे लागतो याचे भान ठेऊन या अभिनव उपक्रमात सहभगी होण्यासाठी **तंत्रनिकेतनचे प्राचार्य श्री. राजेंद्र उत्तुरकर** यांनी शिक्षकांना प्रोत्साहित केले. याच भावनेतून भारती विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरु तंत्रनिकेतन मधील **यंत्र अभियांत्रिकी विभागातील प्रा. निरंजन सुधाकर देशमुख आणि प्रा. अनुप गोविंद राऊत** यांनी स्वेच्छेने ह्या कामात सहभागी व्हायचे ठरवले.

मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार दोघांनीही **पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील भोसरी येथील ६ कोविड हॉस्पिटलचे ऑक्सीजन ऑडिट** दिलेल्या कालावधीमध्ये यशस्वीरीत्या पूर्ण केले, या कामाबद्दल **मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, वरिष्ठ अधिकारी महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी, पुणे तसेच भारती विद्यापीठ मेडिकल फाऊंडेशनच्या कार्यकारी संचालिका मा. सौ. डॉ. अस्मितताई जगताप यांनी सर्वांचे विशेष अभिनंदन केले.**





